**वाचा** :-१. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. भारतीय साथरोग अधिनियम 1897

3. उपविभागीय अधिकारी जावली यांचेकडील पत्र जा.क्र.नैआ/1303/2021 दि.08/04/2021

---

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**सातारा**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा**
**क्र.नैआ/कावि/ 986 /2021**
**दिनांक :-09/04/2021.**

**आदेश**

ज्याअर्थी,आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्याअर्थी, जिल्हयात कोरोना विषाणू संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसार्गात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती सातारा जिल्ह्यात उद्‌भवू नये यासाठी पूर्वतयारी करणे अगत्याचे झाले आहे.

ज्याअर्थी, जावली तालुक्यामध्ये कोविड-19 रुग्णांची संख्या दिवसें-दिवस वाढत असून जावली तालुक्यातील अतिरिक्त संभाव्य रुग्णांसाठी सौ.देवीबाई नारायणदास छाबडा रुरल एज्युकेशन सोसायटी रायगांव ता.जावली जि.सातारा यांचे महालक्ष्मी होमिओपॅथी कॉलेज व हॉस्पीटल, कोविड केअर सेंटरसाठी अधिगृहित करणेबाबत विनंती केलेली आहे.

त्याअर्थी, मी शेखर सिंह, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी सातारा असा आदेश देतो की, कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सौ.देवीबाई नारायणदास छाबडा रुरल एज्युकेशन सोसायटी रायगांव ता.जावली जि.सातारा यांचे होमिओपॅथी मेडिकल कॉलेज व सदर कॉलेजचे वसतिगृह, कोविड केअर सेंटरसाठी पुढील आदेश होईपर्यंत अधिगृहित करणेत येत आहे.

अधिगृहित केलेले महालक्ष्मी होमिओपॅथी मेडिकल कॉलेज व सदर कॉलेजचे वसतिगृह, हे तहसिलदार जावली यांना सर्व मुलभूत सोयी सुविधांसह उपलब्ध करुन हस्तांतरित करुन देणेत येत आहे. सदर अधिगृहित केलेले संपूर्ण मेडिकल कॉलेज व वसतिगृहासाठी भाडे, विजबिल व पाणीबिल असे एकूण प्रतिदिन 3000/- इतकी रक्कम संबंधित संस्था प्रशासनास अदा करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या विरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 आणि साथरोग अधिनियम 1897 अन्वये, नियमानुसार कडक कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

(शेखर सिंह)
जिल्हाधिकारी सातारा तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा

प्रति,

1. उपविभागीय अधिकारी जावली यांना पुढील कार्यवाहीसाठी.
2. तहसिलदार जावली यांना पुढील कार्यवाहीसाठी.
3. सौ.देवीबाई नारायणदास छाबडा रुरल एज्युकेशन सोसायटी रायगांव ता.जावली जि.सातारा यांना पुढील कार्यवाहीसाठी

प्रत – 1. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय सातारा यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
2. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सातारा यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

Scanned by CamScanner